**भारतीय महाविद्यालय, अमरावती**

# राष्ट्रीय सेवा योजना

**(2016 -17)**

**प्रा. निलेश कडू**
**कार्यक्रम अधिकारी**
**डॉ. आम्रपाली वासनिक**
**महिला कार्यक्रम अधिकारी**

---

# विशेष शिबीर अहवाल

सत्र 2016-17 चे विशेष शिबीर **दत्तक ग्राम निभोरा**, ता. भातकुली येथे **05 जानेवारी 2017 ते 12 जानेवारी 2017** या कालावधीत **"स्वच्छ भारत, समृध्द भारत"** या संकल्पनेतून संपन्न झाले. शिबीरामध्ये एकूण 100 विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या पथकाव्दारे ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. **ग्राम स्वच्छता, शेतकरी कार्यशाळा, व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मुलन, पर्यावरण जनजागृती, स्त्रीभृण हत्या जनजागृती, शेतकरी आत्महत्या, महिलांच्या आरोग्य विषयक समस्या व उपाय, दिंडी, प्रभात फेरी, पथनाट्य, स्वच्छ घर सुंदर घर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गितगायन स्पर्धा, पाककला स्पर्धा, नृत्य स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम, बंधारा व शेततळे निर्मिती** इ. उपक्रम शिबीरादरम्यान राबविण्यात आले. या सर्व उपक्रमामध्ये गावंकरी मंडळीचा मोलाचा सहभाग लाभला व समारोपीय कार्यक्रमामध्ये स्पर्धेतील सहभागी गावातील विद्यार्थांना व महिलांना प्रोत्साहनपर बक्षिस वितरीत करण्यात आली.

**विशेष शिबीराचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.**

❖ **05 जानेवारी 2017 (गुरुवार):**

- दत्तक ग्राम निंभोरा येथे सकाळी 10.30 वा. आगमन.
- परिसर स्वच्छता, गावात येणा-या मुख्य रस्त्याची स्वच्छता व सजावट.
- दुपारी, सुरज जवळकर (माजी रा. से. यो. स्वयंसेवक) यांचे रा. से. यो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन.
- शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदानाचे नियोजन व पाहणी.
- गावातील पोलीस पाटील व गावकरी मंडळीशी चर्चा.

❖ **06 जानेवारी 2017 (शुक्रवार):**

- सकाळी प्रार्थना व योगासन आटोपल्यानंतर प्रभात फेरी काढून शिबीराच्या उद्‌घाटन समारंभाची तयारी.
- शिबीराचे उद्‌घाटन सकाळी 10.00 वाजता झाले.
    - उद्‌घाटक : मा. डॉ. सतीश कुळकर्णी (सरचिटणीस, भारतीय विद्यामंदीर, अमरावती)
    - अध्यक्ष : मा. डॉ. ए. जे. गादेवार (प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, अम.)

- प्रमुख अतिथी : मा. डॉ. ज्ञानेश्वरराव गिरी (मुख्याध्यापक, जि. प. शाळा, निंभोरा)

➢ दुपारी स्वयंसेवकांचे गृप करुन गावातील प्रत्येक घरी जाऊन ‘साक्षर, निरक्षर, शौचालय व आरोग्य सर्वेक्षण’ करुन नोंदी घेतल्या.

➢ संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.

➢ रात्री सांस्कृतिक कार्यक्रम सादरकर्ते हर्षल धांडे व सहकारी. नाटकाच्या माध्यामातून स्वच्छता व आरोग्याबद्दल जनजागृती.

❖ **07 जानेवारी 2017 (शनिवार):**

➢ सकाळी प्रार्थना, योगासन व प्रभात फेरीच्या माध्यमातून घोषणा देऊन व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा, पर्यावरण, स्त्रीभृण हत्या जनजागृती केली.

➢ स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.

➢ दुपारी बौध्दिक सत्र

- विषय : **स्पर्धा परीक्षा आणि आजचा युवक**
- वक्ते : डॉ. ओमप्रकाश बोबडे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती)
- अध्यक्ष : प्रा. नितीन तट्टे ( भारतीय महाविद्यालय, अमरावती)

स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम, त्यासाठी लागणारी महत्वाची पुस्तके व यश संपादन करण्यासाठी महत्वाच्या टिप्स देऊन विदर्भातील युवक स्पर्धा परीक्षेमध्ये मागे का? त्याची कारणे, यावर मार्गदर्शन करुन स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होण्याच्या टिप्स दिल्या. आज स्पर्धा ही काळाची गरज आहे. सातत्य कसे टिकवावे आणि हेच यशाचे गमक आहे असे संबोधीत केले.

➢ संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.

➢ रात्री सांस्कृतिक कार्यक्रम सदरकर्ते सुरज जवळकर व सहकारी. नाट्यातून स्त्रीभृण हत्या जनजागृती, व्यसनमुक्ती जनजागृती केली. तसेच गावातील विद्यार्थ्यांसाठी गीतगायन स्पर्धेचे आयोजन केले.

❖ **08 जानेवारी 2017 (रविवार):**

➢ सकाळी प्रार्थना व योगासन.

➢ स्वयंसेवकांनी गावातील तरुणांसोबत गाळाने तुडूंब भरलेल्या सांडपाण्याच्या नाल्या स्वच्छ करुन ग्राम स्वच्छता केली. त्याचबरोबर शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.

➢ दुपारी बौध्दिक सत्र

- विषय : **व्यक्तीमत्व विकास**
- वक्ते : कु. निता लबडे (नायब तहसिलदार, अमरावती)
- अध्यक्ष : प्रा. विद्या पाथरकर (भारतीय महाविद्यालय, अमरावती)

व्यक्तीमत्व विकास म्हणजे काय? व्यक्तीमत्व विकासात वाटा असणारे घटक, व्यात्तीमत्वाची सुधारणा, यशस्वी जीवन जगण्यासाठी व्यक्तीमत्व विकासाचा कसा फायदा होतो यावर मोलाचे मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी, आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कसे फायदेशीर ठरते हे आपल्या वकृत्व शैलीत दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रम सादरकर्ते शंभू पाटील. नाटकाच्या माध्यामातून शेतकरी आत्महत्या जनजागृती व पर्यावरण जनजागृती केली. तसेच गावातील लहान विद्यार्थ्यांसाठी नृत्य स्पर्धेचे आयोजन केले.

❖ **09 जानेवारी 2017 (सोमवार):**

- सकाळी प्रार्थना व योगासन.
- सकाळी 09.00 वा. **'शेतकरी कार्यशाळा'** आयोजन

**निंभोरा, बोरगाव, उत्तमसरा, परलाम व कवठा** या पाच गावांमिळून शेती विषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी शेतक-यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी भारतीय विद्यामंदीराचे अध्यक्ष **प्रा. डॉ. रमेश बिजवे** होते तर उद्घाटन **डॉ. श्रीकांत पाटील** (संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ अम.) यांनी केले. या कार्याशाळेला समृध्दी बायोटेक लॅब अमरावतीचे संचालक **डॉ. संजय गुल्हाने** व **श्री. प्रभाकर पांडे** मंडळ कृषी अधिकारी, भातकुली हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले. तसेच प्रमुख पाहूणे म्हणून भारतीय विद्यामंदीराचे उपाध्यक्ष **श्री. अनंतराव सोमवंशी** व सरचिटणीस **प्रा. डॉ. सतीश कुळकर्णी** तथा भारतीय महविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. अनिल गादेवार** उपस्थित होते. या कार्यशाळेत एकूण 350 शेतक-यांनी सहभाग घेतला.

उद्घाटकीय भाषणामध्ये डॉ. श्रीकांत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले की, शेतक-यांसाठी ही कार्यशाळा एक नावीन्य उपक्रम आहे. बळीराजा सुखी झाला पाहिजे, तरच देश सुखी होईल त्यासाठी बळीराजांनी नवीन तंत्रज्ञान स्विकारुन शेती प्रगत केली पाहीजे. याप्रसंगी त्यांनी संस्थेचे, महाविद्यालयाचे व राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे कौतुक केले. प्राचार्य डॉ. अनिल गादेवार यांनी मनोगत व्यक्त करतांना, विद्यापीठामध्ये प्रथमच भारतीय महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाने शेतकरी कार्यशाळेचे आयोजन करुन शेतक-यांसाठी हा प्रेरणादायी कार्यक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. श्री. अनंतराव सोमवंशी यांनी आपल्या मनोगतामधून शेतक-यांनी आधुनिक शेती करतांना जैव तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे व शेतीचा पोत राखून शेतमालाचे उत्पन्न वाढविले पाहिजे. मी स्वत: शेतकरी असुन गेल्या पाच वर्षापासुन जैविक खताचा वापर करीत आहे व त्याचा मला उत्पन्न वढीमध्ये झालेला फायदा याप्रसंगी त्यांनी विशद केला. तसेच अध्यक्षीय भाषनातून प्रा. डॉ. रमेश बिजवे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, सहज करता येण्याजोगे शेती उद्योग, व्यवसाय आजच्या बदलत्या काळानुसार वाढीस येत आहेत. त्यापैकी सुक्ष्मखतांची निर्मिती, किंवा प्रक्रिया करुन विपनन करणे हा उद्योग किंवा व्यवसाय म्हणून शेतक-यांसाठी अत्यंत चांगला पर्याय ठरु शकतो असे मत याप्रसंगी त्यांनी मांडले.

शेतकरी कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. संजय गुल्हाने यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषनातून शेतक-यांना उद्बोधन करतांना सांगितले की, जीवाणू किती प्रकारचे असतात, त्यांचा पिकांवर होणारा परीणाम, त्यांची लक्षने आणि त्यावर विवीध प्राकारे उपाय योजना व ती कशा प्रकारे करायची या विषयी उत्कृष्ठ मार्गदर्शन केले. तसेच जैविक खताचे महत्व काय, त्याचा वापर कसा करायचा, शेतीची समृध्दी कशी वाढवायची, जैविक अभिक्रिया कशाप्रकारे घडते व जमिनीचा पोत कसा सुधारावा या सर्व प्रश्नांची उकल याप्रसंगी त्यांनी केली आणि द्रवरुप जैविक खतं वापरण्याचे प्रत्यक्षीक त्यांनी शेतक-य़ांना करुन दाखविले व रासायनिक खतांचा वापर टाळण्याचे आवाहन त्यांनी शेतक-य़ांना केले. तसेच मंडळ कृषी अधिकारी श्री. प्रभाकर पांडे यांनी नैसर्गिक स्त्रोतांचा वापर करुन आपल्या शेतीचा पोत सांभाळावा व रासायनिक खतांचा वापर टाळावा असे मार्गदर्शन शेतक-यांना केले.

- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात '**महिलांच्या आरोग्य विषयक समस्या व उपाय**' विषयावर मार्गदर्शन.
  - वक्ते : डॉ. श्रध्दा काकडे (वैद्याकिय अधिकारी, प्रा. आ. केंद्र, माहूली)
  - अध्यक्ष : डॉ. निरज काकडे

  आजच्या धावपळीच्या जीवनात महिलांना उद्‌भवना-या आरोग्य विषयक समस्या कुठल्या, त्यावर उपाययोजना, महिलांनी स्वत:ची काळजी कशी घ्यायची, मानसिक व शारीरीक त्रासामुळे आरोग्यावर होणार परीणाम, बाळंतपणात उद्‌भवनारे आजार व त्यावर उपाय यावर सविस्तर मार्गदर्शन गावातील महिलांना केले.

- **10 जानेवारी 2017 (मंगळवार):**
  - सकाळी प्रार्थना, योगासन व गावातील महिलांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन.
  - स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
  - दुपारी बौध्दिक सत्र
    - विषय : **संत गाडगेबाबांचा वैज्ञानिक दृष्टीकोन**
    - वक्ते : प्रा. नामदेव भगत (समाजकार्य महाविद्यालय, बडनेरा)
    - अध्यक्ष : डॉ. अनिल खांडेकर (भारतीय महाविद्यालय, अमरावती)

    संत गाडगेबाबांचे जीवनचरित्र्य व त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन विवीध उदाहरणाच्या माध्यमातून आपल्या प्रखर भाषण शैलीतून विद्यार्थ्यांना पटवून दिले.
  - संध्याकाळी प्रार्थना, रा. से. यो. गीत व त्यानंतर गावातील लहान मुलांसाठी चित्र रंगभरण स्पर्धाचे आयोजन.
  - रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात '**हिवाळ्यातील पोषक आहार व पाककृती स्पर्धा**'
    - वक्ते व निरीक्षक : प्रा. रचना सिरसाट (भारतीय महाविद्यालय, अमरावती)
    - अध्यक्ष : डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी (भारतीय महाविद्यालय, अमरावती)

रात्री सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये पाककृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. गावातील महिलांनी व विद्यार्थीनींनी यामध्ये भाग घेतला. सुंदर सजावट करुन आपआपली पाककृती या स्पर्धेत सादर केली. स्पर्धेची निरीक्षण प्रा. रचना सिरसाट व डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी यांनी केले व त्यानंतर हिवाळ्यातील पोषक आहार कुठले त्याचे फायदे व पाककृती कशी करायची यावर मार्गदर्शन केले.

❖ **11 जानेवारी 2017 (बुधवार):**

- सकाळी प्रार्थना व योगासन.
- स्वच्छ घर सुंदर घर स्पर्धेचे आयोजन व परिक्षण.
- स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र
    - विषय : **मुल्य शिक्षण आणि राष्ट्रीय सेवा योजना**
    - वक्ते : डॉ. बबीता येवले (क्षेत्रीय समन्वयक,रा.से.यो.,सं.गा.बा.अम.विद्यापीठ अम.)
    - अध्यक्ष : डॉ. राजेश चव्हाण (जिल्हा समन्वयक,रा.से.यो.,सं.गा.बा.अम.विद्यापीठ अम.)

  मुल्य शिक्षण म्हणजे काय? आज त्याची गरज काय? मुल्य कशी रुजवावी, आजच्या शिक्षण प्रणालीत तीचे महत्व, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मुल्य शिक्षणाचे महत्व व त्याचा फायदा याबद्दल मार्गदर्शन केले.
- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात गावातील पुरुष व महिलांसाठी **शारदा महिला सत्संग भजन मंडळ निंभोरा** यांचे भजन आयोजित केले.

❖ **12 जानेवारी 2017 (गुरुवार):**

- सकाळी प्रार्थना, योगासन व दिंडी काढून स्वच्छता व पर्यावरण जनजागृतीच्या घोषणा दिल्या, यामध्ये स्वयंसेवकांनी विविध वेशभुषा केल्या.
- स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीचे काम पूर्ण करुन त्याची सजावट केली व ग्राम स्वच्छता केली.
- दुपारी शिबीर समारोप कार्यक्रम
    - अध्यक्ष : मा. डॉ. ए. जे. गादेवार (प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, अम.)
    - प्रमुख अतिथी : मा. श्री. अनंतराव सोमवंशी (उपाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अम.)
    - प्रमुख उपस्थिती : प्रा. डि. एन. यादगिरे<br>प्रा.रावसाहेब यादगीरे (भारतीय महाविद्यालय, अम.)

समारोपीय समारंभापुर्वी प्रमुख पाहूण्यांनी विशेष शिबीराच्या कार्यपुर्तीचा आढावा घेतला. शेततळे व बंधारा निर्मितीचे काम पूर्णत्वास पाहून समाधान व्यक्त केले. ग्रामस्थांना प्रोत्साहीत करुन उपक्रम राबविले. या सर्व उपक्रमामध्ये गावकरी मंडळीचा उस्फुर्त सहभाग लाभला. स्वच्छ घर सुंदर घर स्पर्धा, पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, गितगायन स्पर्धा, नृत्य स्पर्धाचे बक्षिस वितरीत करण्यात आले.

**प्रा. निलेश कडू**
**कार्यक्रम अधिकारी**

**डॉ. आम्रपाली वासनिक**
**महिला कार्यक्रम अधिकारी**

**प्रा. पंडीत काळे**
**सहकार्यक्रम अधिकारी**

**प्रा. गायत्री चवाळे**
**सहमहिला कार्यक्रम अधिकारी**